# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** सिल्लोड सिटी
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0183 **Year (वर्ष):** 2025
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/08/2025 21:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** शुक्रवार
      **Time Period (कालावधी):** पहर 5
      **Date From (दिनांक पासून):** 29/08/2025
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/08/2025
      **Time From (वेळेपासून):** 14:30 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 14:30 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 29/08/2025 **Time (वेळ):** 17:00 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 018
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/08/2025 21:28 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** रजिस्ट्री कार्यालय समोर, मार्केट यार्ड परिसरातील रुम मध,सिल्लोड , 431112

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): रामेश्वर केशवराव सावळे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1982

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस कलनी टीव्हीसेंटर,छत्रपती संभाजीनगर ,सिडको ,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस कलनी टीव्हीसेंटर,छत्रपती संभाजीनगर ,सिडको ,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9923596275

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सांडु नारायण शेलार | | | 1. समतानगर, सिल्लोड,सिल्लोड , सिल्लोड सिटी,औरंगाबाद ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | अँथ्रासिन पावडर लावलेली | 68,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | रक्कम 68000/रुपये | |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

68,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 29/08/2025

मी रामेश्वर केशवराव सावळे, वय 43 वर्ष, व्यवसाय नोकरी, रा.पोलीस कॉलनी टी.व्ही.सेंटर, छत्रपती संभाजीनगर, मो.नं. 9923596275

मी वरील प्रमाणे असुन, दि.28/08/2025 रोजी पो.नि.केशव दिंडे यांचेकडे समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे समक्ष हजर येऊन दोन पंचासमक्ष तक्रार दिली होती की, माझे मुळ गांव मोहाळ, ता.सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर असे आहे. मी पोलीस विभागात पोलीस अंमलदार म्हणुन डयुटी करतो. मौजे चिचपूर शेत गट नं. 123 मध्ये मध्ये मी श्री. महेंद्र उत्तमराव बावस्कर रा.मांडणा यांचेकडुन विहीर खोदण्यासाठी 2 गुंठे जमीन खरेदीचा करार केलेला आहे. सदर जमीन ही माझे पत्नीचे नावे करण्याची होती. सदर 2 गुंठे जमीन खरेदीच्या रजिस्ट्री करीता रजिस्ट्री कार्यालय, सिल्लोड येथे दि.25/08/2025 रोजी गेलो असता तेथील एजंट नामे- सांडु शेलार पुर्ण नाव माहीत नाही याने सांगितले की, शेत गटात तुमच्या पत्नीचे नाव नसल्याने तुमचे स्वत:चे नाव त्या गटात असल्याने रजिस्ट्री ही तुमच्या नावे होण्यास सोपे जाईल परंतू तुमच्या पत्नीचे नावे करायला आंवघड जाईल असे म्हणुन सदर 2 गुंठे जमीन तुमच्या नावावर करावी लागेल. व त्यासाठी 70 हजार रुपये खर्च येईल.

त्यात 10 हजार रुपये चलन व 60 हजार रुपये रजिस्ट्रार साहेबाला दयावे लागतील कारण सदरची रजिस्ट्री ही नियमात बसत नाही. कारण तुकडाबंदीमुळे 2 गुंठे जमीनीची रजिस्ट्री होत नाही आणि जर करायची असेल तर साहेबाला पैसे दिल्याशिवाय होणार नाही. त्याचे चलन 1,60,000/- रुपये निघत आहे असे सांगुन गट नं.123 च्या 7/12 वर एकुण 1,60,000/- रुपये असा आकडा लिहलेला होता सदरचा 7/12 मला दिला. त्यावेळी मी श्री. शेलार यांना चलनाशिवाय एवढे पैसे कसं काय असे बोललो तर त्यांनी तुमची रजिस्ट्री त्या शिवाय होणार नाही असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना नाईलास्तव ठिक आहे असे म्हणुन निघुन गेलो.

मला एजंट श्री. शेलार, रजिस्ट्री कार्यालय, सिल्लोड यांना किंवा रजिस्ट्रार श्री. काळे यांना माझ्या वरील जमीन खरेदीच्या शासकीय चलना शिवाय इतर पैसे देण्याची इच्छा नाही. माझेत व एजंट श्री. शेलार किंवा श्री काळे रजिस्ट्रार यांचेत पैश्याचा देण्या घेण्याचा व्यवहार नाही. वैर दुश्मनी नाही. तरी रजिस्ट्रार श्री. काळे किंवा एजंट श्री. शेलार यांनी किंवा त्यांच्या वतीने इतर कोणी माझ्या वरील कामासाठी कायदेशीर चलनाशिवाय 60 हजार रुपयांची मागणी करुन ती स्विकारल्यास त्यांचेवर कारवाई होणेस विनंती आहे. माझे वरील कामासाठी मला आज दि. 28/08/2025 रोजी सायंकाळी 04.00 वा.पर्यंत श्री. शेलार, एजंट यांनी सिल्लोड येथे बोलविले आहे.अशी तक्रार दिली होती.

त्यानंतर माझ्या बरील तक्रारीवरुन दि.28/08/2025 रोजी दुपारी अंदाजे 02.00 वा.सुमारास मी, पो.नि.केशव दिंडे, दोन शासकीय पंच, सापळा पथक असे माझ्याकडील माझ्या मित्राच्या खाजगी गाडीने मी गाडी चालवित असे आम्ही सिल्लोड येथे पोहचलो त्यानंतर आम्हा सर्वांना पोनि दिंडे साहेबांनी लाचमागणी पडताळणी व सापळा कारवाईच्या अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या अंगावर लपवुन दिला व सोबत पंच क्र.1 त्रिभुवन यांना देऊन लाचमागणी पडताळणी करीता श्री.शेलार खाजगी एजंट यांचेकडे पाठविले त्याप्रमाणे आम्ही जाऊन श्री. शेलार यांची भेट घेतली परंतू त्यावेळी त्यांनी उद्या या आपण काम करु व साहेबांना भेटू असे म्हणुन मला जास्त कांही न बोलता आज दि.29/08/2025 रोजी सकाळी

11 वाजेपर्यंत सिल्लोड येथे येण्याचे सांगितले.
त्याप्रमाणे आज दि.29/08/2025 रोजी श्री. शेलार यांनी बोलविल्याप्रमाणे मी, पोनि दिंडे, दोन पंच, सापळा पथक असे आम्ही 12.00 वा.सुमारास सिल्लोड येथे सुरक्षित ठिकाणी पोहचलो. त्यानंतर परत आम्हाला पोनि दिंडे यांनी लाचमागणी अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर माझ्या अंगावरील कपडयात लपवुन दिला. व सोबत पंच क्र.1 यांन दिले. त्याप्रमाणे मी व पंच क्र.1 असे खाजगी एजंट श्री. शेलार यांची रजिस्ट्री ऑफीस समोरील मार्केट यार्ड पसिरातील एका खोलीत भेट घेतली. त्यावेळी श्री. शेलार यांनी आमच्या वरील दोन गुंठे जमीन खरेदीच्या अनुषंगाने साक्षीदार, खरेदी विक्रीदाराचे फोटो,कागदपत्र या बाबत चर्चा झाली त्यावेळी मी शेलार यांना बोललो की, साहेबाला भेटुन थोडं फार कमी, माझ्या ओळखीनी काही कमी झाले तं, त्यावेळी शेलार बोलले की, तुम्ही बोलु नकाना बोलु, कोणता अधिकारी बोलतो बर, पैशाचं असं बोलले. त्यावेळी मी तुम्ही बोला असे बोललो तर त्यांनी तुम्ही सांगा तं, कोणता अधिकारी बोलतो, पैशाचं, असे म्हणुन रजिस्ट्रार काळे यांना मला भेटू देण्यास मनाई केली. त्यानंतर मी बोललो दहा हजार चलन सांगीतलं ना, साठ हजार साहेबाचं म्हणताय त्यावेळी त्यांनी गुपचुप देऊन करुन घ्या, काही राहत नाही त्याच्यात असे बोलले त्यावेळी मी मिसेस येऊ लागली, बस स्टँड वरुन घेऊन येतो, असे सांगुन सापळा पथक थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी पोनि दिंडे साहेबांकडे पंच क्र.1 सह परत आलो. त्यानंतर माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला.
त्यानंतर लाचमागणी पडताळणीत काय घडले याबाबत पंच क्र.1 यांना विचारपुस केली त्यानंतर मला विचारपुस केली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यातील माझे व खाजगी एजंट श्री. शेलार यांचेतील संभाषण ऐकले. त्यानंतर पोनि दिंडे साहेब सापळा कारवाईच्या अनुषंगाने सुचना देत असताना मला माझ्या फोनवर खाजगी एजंट श्री. शेलार यांचा फोन आला तो फोन दोन्ही पंचासमक्ष पोनि दिंडे यांनी व्हाईस रकॉर्डरमध्ये रेकॉर्डींग केला आहे. त्यावेळी त्यांनी मला फोनवर तात्काळ पैसे घेऊन येण्याचे बोलत होते त्यावेळी मी त्यांना बोललो की, मिसेसनी पैसेच कमी आणले व मिसेस माझ्यावर चिडू राहिली असे बोललो तर त्यांनी पहा मंग तुमची इच्छा असे बोलले त्यावेळी मी त्यांना परत किती आणु मंग बोललो, त्यांनी 2 हजार कमी दे भाऊ बाकी बघा तुम्ही असे बोलले त्यावेळी 2 हजार कमी 68 का असे बोललो तर त्यांनी हां..असे बोललो त्यावेळी मी परत 68 घेऊन येऊ का मंग..बोललो तर त्यांनी हां..असे बोलले त्यावेळी मी बर बर ठिक हाय असे बोलुन फोन कट केला.
त्यानंतर सदर लाचमागणी पडताळणीत खाजगी एजंट शेलार यांनी मागणी केलेल्या 70 हजार रुपयांतुन फोनवरुन 2 हजार रुपये कमी दे असे म्हणुन 68,000/- रुपये घेऊन येण्याचे सांगितले. त्यात 10 हजार रुपये चलन व 58 हजार रुपये चलना व्यतीरिक्त आणण्याचे सांगितले.
त्यानंतर पोनि दिंडे यांनी मला 10 हजार रुपये चलन व 58 हजार रुपये चलनाव्यतीरिक्त श्री. शेलार यांना देण्यासाठीच्या पैश्या बाबत विचारणा केली असता मी माझे नातेवाईकांच्या फोन पे वर 70 हजार रुपये पाठवुन त्यांचेकडुन नगदीने 70 हजार रुपये घेतले व त्यातील 68 हजार रुपये ज्यात 500 रु.दराच्या 136 नोटा पोनि दिंडे यांचेकडे हजर केल्या. त्यावेळी मला, दोन्ही पंचांना ॲन्थ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पच्या गुणधर्माबाबत माहीती दिली. त्यानंतर त्या नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन घेऊन त्या नोटांना ॲन्थ्रॉसीन पावडर लावुन माझ्या अंगातील पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवुन दिल्या. त्यानंतर व्हाईस रकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करन व्हाईरेकॉर्डर माझ्या अंगावर लपवुन दिला व पंच क्र.1 यांना सोबत देऊन श्री. शेलार यांना चलनाची व लाचेची रक्कम देण्यासाठी दुपारी 02.15 वा.पाठविण्यात आले.
त्याप्रमाणे मी व पंच क्र.1 यांनी श्री. शेलार यांची रजिस्ट्री कार्यालया समोरील मार्केट यार्ड परिसरातील खोलीत जाऊन भेट घेतली त्यावेळी त्यांनी मी त्यांना पैशासाठी धावपळ झाल्याचे बोलतो त्यावेळी शेलार बोलले की, नई तुम्ही दुसऱ्या कडुन आणणार होते ना पैसे त्यावेळी मी बोललो दुसऱ्या हे पहा जव्हा आपलं भाचीच्या नवऱ्याकडुन पैसे घेतले, विकास कडुन..त्यावेळी ते बोलले की, दया पटकन, मोकळं व्हा ना त्याला काय लागतं आता.त्यावेळी मी बोललो काय आडचण नही येणार ना आता, होईल ना व्यवस्थीत त्यावेळी ते बोलले, झालं आपलं सगळं ओके झालं, मला जेवायला जायचं घरी, मला शुगर वाला पेशंट मी , मी बिमार माणुस हे.असे म्हणले त्यावेळी माझ्या पॅन्टच्या उजव्या खिशातील 68 हजार रुपये ज्यास ॲन्थ्रॉसीन पावडर लावलेली माझ्या उजव्या हाताने काढुन श्री. शेलार यांचे समोर धरली त्यावेळी श्री. शेलार यांनी ती रक्कम त्यांच्या डाव्या हाताने स्विकारली त्यावेळी मी तुम्ही सांगील्या प्रमाणं अडुसट, अडुसष्ट हे असे बोललो त्यावेळी श्री. शेलार यांनी ठिक हाय असे म्हणुन त्यांचे दोन्ही हाताने 68 हजार रक्कम मोजुन घेतली. व डाव्या हाताने त्यांचे अंगातील पॅन्टच्या समोरील डावे बाजुचे खिशात ठेवली.त्यावेळी मी बोललो दोनच कमी केले तुम्ही सत्तर मधले.असे बोललो तर त्यांनी अजुन किती कमी करत्या असे बोलले. त्यावेळी मला जमीन लिहुन देणारे महेंद्र उत्तम बावस्कर व संतोष कचरु गायकवाड हे हजर होते. त्यावेळी श्री. शेलार यांनी त्यांचा डाटा एन्ट्री ऑपरेटर यांचेकडुन डाटा एन्ट्री फॉर्म व खरेदी विक्रीचे कागदपत्र तयार

केले. त्यावेळी मी चलनाचे पैसे व लाचेची रक्कम स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा म्हणुन मी माझे अंगातील पॅन्टच्या डाव्या बाजुचे समोरील खिशातुन हात रुमाल डाव्या हाताने काढुन डाव्या हाताने चेहरा पुसणे असा केला ती वेळ दुपारी 02.30 वाजेची होती. त्यावेळी तात्काळ पोनि दिंडे, सापळा पथक, पंच क्र.2 घटनास्थळी हजर आले त्यांनी पंच क्र.1 यांना विचारपुस केली त्यानंतर मलाही विचारपुस केली. त्यावेळी आमचे समोर हजर असलेले श्री. शेलार यांनी चलनाची रक्कम व लाचेची रक्कम असे मिळुन 68 हजार रुपये घेतल्याचे आम्ही सांगितले. त्यावेळी पोनि दिंडे यांनी श्री. शेलार यांना त्यांचे नाव विचारता त्यांनी त्यांचे नाव- सांडु नारायण शेलार, वय 46 वर्ष, व्यवसाय खाजगी एजंट, रा.समतानगर, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर असे सांगितले. त्यावेळी त्यांना माझ्याकडुन घेतलेल्या चलनाच्या व लाचेच्या रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे अंगातील डाव्या बाजुचे समोरील खिशात ठेवली असल्याचे सांगितले. त्यावेळी पोनि दिंडे यांनी दोन्ही पंचासमक्ष सांडु नारायण शेलार यांचेकडुन पंच क्र.2 यांचे करवी मी दिलेल्या चलनाचे 10 हजार व चलना व्यतीरिक्त लाचेची रक्कम 58 हजार असे एकुण 68 हजार रुपये ज्यात 500 रु.दराच्या 136 नोट काढुन ताब्यात घेतल्या.

त्यानंतर त्या खोलीतील लाईट व दरवाजा बंद करुन, त्या नोटांवर, सांडु शेलार यांचे दोन्ही हातावर, शेलारचे यांचे अंगातील पॅन्टच्या डाव्या बाजुचे समोरील खिशाचे आत व खिशाचे तोंडवर अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकुन पाहिला असता ॲन्थ्रॉसीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच माझे ही अंगावर अल्ट्रा व्हायलेटचा प्रकाश टाकला असता माझे पॅन्टचे उजवे बाजुचे समोरील खिशात व उजव्या हाताचे तळहातावर व बोटाव हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पोनि दिंडे यांनी माझ्या रजिस्ट्रीचे कागदपत्र श्री. शेलार यांचेकडुन ताब्यात घेतले. त्यावेळी माझ्या वरील खरेदी खताचे शासकीय चलन हे 8000/-स्टॅम्प डयुटी, 1600/-रजिस्ट्रेशन फि, व 640/- हताळणी फि असे एकुण 10,240/- रुपये शासनास भरल्याचे दिसुन आले. व त्या शिवाय 57,760/- रुपये लाचेची रक्कम घेतल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आम्ही सर्वजन पोलीस स्टेशन सिल्लोड शहर येथे आलोत.

तरी श्री. सांडु नारायण शेलार खाजगी एजंट यांनी मी खरेदी करण्या करीता करार केलेल्या चिंचपूर येथील शेत गट क्र.123 मधील दोन गुंठे जमीन खरेदीखत करुन देण्यासाठी 70 हजार रुपयांची मागणी करुन त्यात मी कमी करण्याची विनंती केली असता त्यात 2 हजार कमी करुन 68,000/- रुपये मागणी केली. व मागणी केलेली 68,000/- रुपये रक्कम श्री. शेलार यांनी दि.29/08/2025 रोजी दुपारी 02.30 वा. मार्केट यार्ड परिसर सिल्लोड येथील एका खोलीत स्वत: स्विकारली. त्यात त्यांनी माझ्या वरील जमीन खरेदीचे शासकीय चलन म्हणुन एकुण 10,240/- हजार रुपये शासनास भरणा केल्याची चलन पावती दिली व उर्वरीत 57 ,760/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिंर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टाईप केली असुन ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.

हि फिर्याद दिली सही.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sheshrao abaji udar(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** sheshrao abaji udar
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**